# ६ पाश्चात्य चित्रकला


१७ व्या शतकात 'बारोक कला' व १८ व्या शतकात 'रोकोको कला' निर्माण झाल्या. नाट्यपूर्णता व अलंकारिकता ही कलेची खास वैशिष्ट्ये होती.

याच काळात छायाचित्रण (फोटोग्राफी) व मुद्रणकला यांचा शोध लागला. त्यामुळे कलावंतांनी स्वीकारलेल्या वास्तवदर्शी चित्रणाच्या ध्येयात काही स्वास्थ्य उरले नाही. मुद्रणकलेमुळे प्रसिद्ध कलाकृतींच्या छापील प्रती थोड्या किमतीत उपलब्ध होऊ लागल्या. शिवाय रंगांचे शास्त्रीय संशोधन होऊन रंगशास्त्रही प्रगत झाले. या सर्व परिस्थितीमुळे कलेच्या उद्दिष्टांत क्रांतिकारी बदल होणे अपरिहार्य झाले. वास्तववादी चित्रणाची मळलेली वाट सोडून कलाकार नव्या मार्गाचा शोध घेऊ लागले व नवेनवे प्रयोग करू लागले. या प्रयत्नातून आधुनिक कलाप्रवाहांचा जन्म झाला.

## १. आधुनिक कलाप्रवाह

### दृकप्रत्ययवाद (इंप्रेशनिझम) :

१९ व्या शतकाच्या शेवटी युरोपात औद्योगिक क्रांती झाली. विविध शास्त्रीय शोध लागले. त्यात नवनवीन यंत्रांची निर्मिती झाली. त्यामुळे मानवी जीवन व सांस्कृतिक वातावरण यांत आमूलाग्र बदल झाला. त्याचा परिणाम झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीत कलाक्षेत्रातील पारंपरिक नियम व प्रमाणे यांच्यावरही झाला. नव्या युगाशी सुसंवाद राखणारी नवी कलात्मक भाषा निर्माण करण्याची गरज भासू लागली. कॅमेऱ्याच्या शोधामुळे वास्तववादी ॲकॅडेमिक कलाशैलीचे महत्त्व कमी झाले. परिणामी या कलावंतांना पारंपरिक शैलीला नवीन पर्याय शोधण्याची गरज भासू लागली. या सर्व घडामोडींमधूनच आधुनिक कलेचा जन्म झाला आणि सर्वप्रथम कलेच्या क्षेत्राला नवे वळण देणाऱ्या दृकप्रत्ययवादाचा जन्म इ.स. १८६० च्या सुमारास झाला.



क्लॉद मोने

'क्लॉद मोने' हा दृकप्रत्ययवादाचा प्रणेता मानला जातो. त्याने निर्माण केलेल्या 'इंप्रेशन सनराईज' या कलाकृतीवरून कलासमीक्षकांनी या शैलीला 'इंप्रेशनिझम' असे नाव दिले. या कलासंप्रदायामध्ये पुढील वैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

१. या कलासंप्रदायामध्ये आपणास वस्तूंचे दर्शन, त्यावर पडणाऱ्या व त्यापासून परावर्तित होणाऱ्या प्रकाशामुळे घडते. म्हणून चित्रकाराने वस्तूचे चित्रण न करता, तिच्यावर पडलेल्या प्रकाशाचे चित्रण केले पाहिजे. म्हणजेच प्रकाशाच्या परिणामाला अधिक महत्त्व दिले पाहिजे.

२. नैसर्गिक प्रकाशाचा वस्तूवरील परिणाम शक्य तितक्या लवकर चित्रित केला पाहिजे. त्यांसाठी



चित्र : 'इंप्रेशन सनराईज'

चित्रात घटकांचे संयोजन व रेखाटन बारकाव्यानिशी करण्याचा खटाटोप करू नये.

३. नैसर्गिक प्रकाशात रंग दिसतात. म्हणून दृकप्रत्ययवादी चित्रणात 'रंग व प्रकाश' या दोन गोष्टी महत्वाच्या आहेत.

४. शेवरूलने प्रतिपादन केलेल्या विरोधाभासाच्या आणि इतर रंगशास्त्रीय नियमांना अनुसरून रंगयोजना केली पाहिजे. निसर्गात काळा रंग नाही, म्हणून त्याचा वापर करू नये.

५. निसर्गातील रंग शुद्ध व तेजस्वी असतात. तसा परिणाम साधण्यासाठी रंगफलकावर रंगांचे प्रत्यक्ष मिश्रण न करता दोन शुद्ध रंगांचे लहानलहान ठिपके कॅनव्हासवर लावावेत. चित्र काही अंतरावरून पाहिल्यास त्याच्या मिश्रणातून तयार होणाऱ्या रंगाचा परिणाम साधला जातो. त्यामुळे रंगांची तेजस्विता कायम राहते.

६. वस्तूवरील प्रकाश व रंग यांशिवाय इतर गोष्टींकडे लक्ष न देता चित्रण करावे. यातूनच अप्रतिरूपवादाचा श्रीगणेशा झाला. रंगांच्या मुक्त वापरामुळे त्यातून आधुनिक कलेतील विविध कलासंप्रदायांची निर्मिती झाली.

७. दृकप्रत्ययवादातील प्रकाशाच्या परिणामाला दिलेल्या अधिक महत्वामुळे भावाविष्काराकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष झाले.

## आविष्कारवाद : (एक्सप्रेशनिझम)



एडवर्ड मुंक



चित्र : 'द क्राय' (एडवर्ड मुंक)

इ.स. १९१४ मध्ये जर्मनीत या वादाची निर्मिती झाली. दृकप्रत्ययवाद्यांनी भावनाविष्काराकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. त्याविरुद्ध उठाव करणाऱ्या व भावनाविष्कारावर भर देणाऱ्या कलावंतांनी या वादात चित्रनिर्मिती केली. आविष्कारवाद हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. जोरदार भावनिक आशय व्यक्त करणाऱ्या कोणत्याही कलाकृतीविषयी ही संज्ञा विशाल अर्थाने वापरली जाते. भावनांना महत्त्व देऊन चित्रनिर्मिती करण्यावर या कलावंतांचा भर होता. त्यांच्या मते 'भावनाविष्कार' हा कलाकृतीचा 'आत्मा' आहे. या आविष्कारवादाचा प्रणेता म्हणून एडवर्ड मुंकचा उल्लेख केला जातो. त्याचप्रमाणे व्हॅन गॉख व पॉल गोगॅ या रंगभरवादी कलावंतांनाही आविष्कारवादी मानले जाते.



व्हॅन गॉख



चित्र : 'व्हास विथ फिफ्टिन सनफ्लॉवर्स' (व्हॅन गॉख)


आविष्कारवादाची निर्मिती जर्मनीत झाली. जर्मन लोक हे भावनाप्रधान आहेत. त्यांच्या स्वभावानुसार काहीशा तर्क सामर्थ्यावर भर देणारी आणि जीवनातील तणावांचे, दु:खाचे दर्शन घडवणारी ही कला आहे आणि हीच आविष्कारवादाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या वादात रेषाप्रधान चित्रांची निर्मिती करून ती गडद रंगात, विशेषत: काळ्या व तपकिरी रंगाकडे जाणाऱ्या रंगांमध्ये रंगवलेली आहेत. या वादात मानवी जीवनातील दु:खी भावनांचे प्रकटीकरण आधी केलेले आहे. त्यामुळे यातील चित्रांचे विषय कारुण्य, तिरस्कार, संताप, अंध:कार व भय यांकडे झुकलेले दिसतात. त्याचप्रमाणे या वादातील रंगलेपन कुंचल्याच्या मोठमोठ्या जोरकस फटकाऱ्यांनी केलेले आहे. सौम्य व आनंदी भावनांचा



चित्र : 'स्टारी नाईट' (व्हॅन गॉख)

मनोहारी व गोंडस आविष्कार या वादात फारसा आढळत नाही. जीवनातील कष्टप्रद तणावांचा आविष्कार करणे हेच या वादाचे मुख्य ध्येय होते. आविष्कारवादाचे चित्रकारांच्या शैलीवरून दोन गट पडतात. (१) 'द ब्रिज ग्रुप' आणि (२)'द ब्ल्यू रायडर ग्रुप'. पहिल्या गटामध्ये हेकेल एमिलगोड व कर्चनर असे कलावंत होते तर दुसऱ्या गटात कॅडेस्की, मार्क क्ले, मॅक्स बेकमन, एडवर्ड मुंक. या प्रसिद्ध कलावंतांनी नवीन प्रयोग करून पुढे 'केवलवादाची' मुहूर्तमेढ रचली. या वादातील एडवर्ड मुंकचे 'द क्राय' व व्हॅन गॉखचे 'स्टारी नाईट' या कलाकृती विशेष उल्लेखनीय आहेत.

### घनवाद : (क्युबिझम)



जॉर्ज ब्राक

आधुनिक युगातील एक महत्त्वाचा कलासंप्रदाय म्हणून घनवादाकडे पाहिले जाते. घनवादाची सुरुवात इ.स. १९०७-०८ मध्ये झाली आणि पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभापर्यंत हा वाद प्रभावशाली होता. या वादाचे आद्यप्रवर्तक म्हणून 'पिकासो'व 'ब्राक' हे ओळखले जातात. दृकप्रत्ययवादातील चित्रकार 'पॉलसेझाँ' याने केलेल्या लिखाणातून पिकासो व ब्राँक यांना प्रेरणा मिळाली. सेझाँचा मृत्यू १९०६ मध्ये झाला. त्यानंतर या दोन्ही चित्रकार मित्रांनी त्या लिखाणांवरून चित्र निर्मितीला प्रारंभ केला. घनवादात भौमितिक यथार्थ दर्शनाला

फाटा दिला. वस्तूंच्या आकारांच्या पृथक्करणातून मिळणाऱ्या विविध पातळ्या व तिच्या बाजूंचे लहान लहान तुकडे यांचे केलेले संयोजन, करड्या रंगापेक्षा वेगळ्या रंगात रंगवण्यावर त्यांनी भर दिला. डोळ्यांना जसे दिसते तसे चित्रण मात्र त्यात नाही.



**चित्र : 'स्टील लाईफ' (जॉर्ज ब्राक)**

घनवादाच्या निर्मिती अगोदर वस्तूचे चित्रण एकाच दृष्टिकोनातून वस्तू जशी दिसेल तसे केले जात होते. परंतु त्या पद्धतीत बदल केल्यामुळे घनवादाचे दोन प्रकार पडले.

१. **विश्लेषणात्मक घनवाद :** या प्रकारामध्ये वस्तूच्या रूपाचे विविध पातळ्यांवर अनेक तुकड्यांमध्ये पृथक्करण करून त्यांनी एकत्रितपणे रचना करण्यात येत असे. वस्तूचे तुकड्यांमध्ये रूपांतर करताना भौमितिक आकारांचा वापर केला जात असे. या तुकड्यांनी आच्छादन पद्धतीने रचना केली जात असे. या प्रकारात पिकासोचे 'मा जॉली' व ब्राकचे 'स्थिरचित्रे' ही चित्रे प्रसिद्ध आहेत.

२. **संश्लेषणात्मक घनवाद :** या दुसऱ्या प्रकारात एक वस्तू वेगवेगळ्या बाजूंनी पाहिली असता ती जशी दिसेल, तशी तिची सर्व रूपे एकाच आकृतीत दर्शवणारी 'तीन संगीतकार' ही कलाकृती उल्लेखनीय आहे.

घनवाद्यांनी आकारांच्या मूळ रचनेचे अनेक तुकडे केल्यामुळे आणि ते भौमितिक आकारात मांडल्यामुळे त्यात वास्तवता राहिली नाही व त्यातील सौंदर्य कमी झाल्यामुळे आकर्षकता निर्माण होण्यासाठी या चित्रांमध्ये उजळ व आकर्षक रंगांचा वापर केलेला आहे. त्यातील रंगलेपन मात्र सपाट पद्धतीने केलेले आहे. या नव्या तंत्राचा वापर करून पुढे अनेक कलाकृती निर्माण करण्यात आल्या. २० व्या शतकातील बदलेल्या परिस्थितीला अनुरूप व शोभणारी कला त्यांना निर्माण करायची होती. या उद्देशाने त्यांनी कलाक्षेत्रात नवे नियम निर्माण केले व नवी तंत्रे शोधून त्याचा उपयोग चित्रनिर्मितीत केला. घनवादात पिकासो व ब्राक यांच्याखेरीज ग्रिस, लेजे, व्हिलॉ, मार्सेलदुशाॅ या कलावंतांनी चित्रनिर्मिती केली. घनवादातून 'कोलाज' हे नवे तंत्र निर्माण झाले.

पाब्लो पिकासो हा मूळचा स्पॅनिश कलावंत नंतर फ्रान्समध्ये स्थायिक झाला. तो अलौकिक प्रतिभेचा महान कलावंत होता. बालपणापासून चित्रकलेची आवड असलेला पाब्लो पिकासो वयाच्या सोळाव्या वर्षीच मान्यवर व्यावसायिक चित्रकार म्हणून प्रसिद्ध झाला. चित्रकाराबरोबरच तो शिल्पकार आणि मुद्राचित्रकारही होता. या प्रत्येक क्षेत्रात त्याने नवनवीन प्रयोग करून वैशिष्ट्यपूर्ण अशी कलानिर्मिती केली. वास्तववादी आणि पारंपरिक चित्रशैलीत चित्रनिर्मितीची सुरुवात करून नंतर त्यात काळानुरूप बदल करून नव्या वाटा शोधल्या त्यात काही काळ त्याने दृकप्रत्ययवादामध्ये चित्रनिर्मिती केली. कालांतराने १९०७ च्या सुमारास ब्राक या मित्रासोबत घनवादाची निर्मिती केली. घनवादातील 'तीन संगीतकार' 'मा जॉली' या त्यांच्या कलाकृती उल्लेखनीय ठरल्या. यासोबतच आविष्कारवाद, अप्रतिरूपवाद, अतिवास्तववाद अशा अनेक कलासंप्रदायांमध्ये निर्मिती करून शेवटी त्याने आपली स्वतःची खास शैली निर्माण केली. इ.स. १९३७ साली जर्मनीने

स्पेनमधील ग्वेर्णिका शहरावर केलेल्या बॉम्ब हल्ल्याचा निषेध करण्याच्या हेतूने केलेली आविष्कारवादी शैलीतील 'ग्वेर्णिका' ही पिकासोची राजकीय विषयावरील कलाकृती जगप्रसिद्ध झाली.



**चित्र : 'ग्वेर्णिका' (पाब्लो पिकासो)**

त्याच्या चित्रशैलीवर आफ्रिकन शिल्पांचा प्रभाव जाणवतो. या प्रभावातील त्याची 'अ‍ॅव्हेन्यूच्या स्त्रिया' ही कलाकृती उल्लेखनीय आहे. पिकासोने वस्तूकडे अनेक दृष्टिकोनांतून पाहिल्यावर दिसणारी दृश्ये, एकाच चित्रात संयोजित करण्याचे नवीन तंत्र कलाक्षेत्रात रूढ केले. रंग, शाई या पारंपरिक माध्यमांखेरीज रंगीत पेपर, वर्तमान पेपर, रंगीत दोरे वगैरे वस्तू चिकटवून कलानिर्मिती करता येते, हे पिकासोने 'कोलाज' तंत्रातून दाखवून दिले. आपल्या आयुष्याची ७० हून अधिक वर्षे व्यावसायिक कलावंत म्हणून यशस्वीपणे घालवणाऱ्या पिकासोने २० व्या शतकातील आधुनिक कलाकृतींच्या विक्रीतून करोडो डॉलर्सची संपत्ती मिळवली. आयुष्यात भरपूर सुख, संपत्ती व नावलौकिक मिळवणाऱ्या पिकासोचे राहणीमान मात्र सामान्य होते.



**चित्र : 'थ्री म्युझिशियन' (पाब्लो पिकासो)**

## अतिवास्तववाद : (सर्रिॲलिझम)

२० व्या शतकातील अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी कलाप्रणाली म्हणून या वादाकडे पाहिले जाते. इ.स १९२३ मध्ये या वादाची निर्मिती झाली. या वादाची निर्मिती पहिल्या महायुद्धाच्या सुमारास निराश व भ्रमनिरास झालेल्या चित्रकारांनी 'दादावाद'या नव्या कलाप्रवाहास जन्म दिला. युद्धकाळात सामाजिक व नैतिक सुव्यवस्थेला काहीच अर्थ उरलेला नव्हता. नकारात्मक भूमिकेतून त्यांनी चित्रनिर्मिती केली. त्यांच्या या दादावादातूनच अतिवास्तववादाची निर्मिती झाली.

साल्व्हेदोर–द–दाली आणि मॅक्स या चित्रकारांनी अतिवास्तववाद निर्माण केला. या वादाच्या निर्मितीमागे 'फ्राईड' या मानसशास्त्रज्ञाचा मानवी मनाचा विचार महत्त्वाचा मानला गेला. त्याच्या मते मानवी मनाचे दोन भाग पडतात :

१) अंतर्मन
२) बाह्यमन

या दोन्ही मनांची सांगड घालून या वादातील चित्रकारांनी चित्रनिर्मिती केली. प्रत्यक्षात दिसणाऱ्या सृष्टीमागे लपून बसलेले रहस्य किंवा सत्य शोधून, त्यावर सखोल संशोधन करून नवनिर्मिती करणे हे या वादाचे मुख्य ध्येय होते. त्यामुळे या वादातील चित्रे स्वप्नातील घटनांवर आधारित वाटतात, तसेच प्रत्यक्षात कधीही न घडणाऱ्या घटनांचे चित्रण या वादात केलेले दिसते. या चित्रांमध्ये वास्तवतेपेक्षा वेगळ्या घटनांना व रचनेला महत्त्व दिलेले आहे. प्रेक्षकांच्या अंतर्मनावर परिणाम करणाऱ्या घटनांचे यात चित्रीकरण केलेले आहे. या वादातील चित्रे दिशाभूल करणारी वाटतात



साल्व्हेदोर – द – दाली

आणि मुख्य म्हणजे या चित्रामध्ये कधीही एकत्र न येणाऱ्या वस्तूंचे व घटनांचे चित्रण केल्यामुळे ही चित्रे वास्तववादी असूनही अवास्तव वाटतात. या चित्रांच्या दृश्यांची पूर्तता फक्त स्वप्नातच होऊ शकते. उदा. कपाटातून निघणारी रेल्वे, घड्याळाला लागलेल्या मुंग्या, मानवी चेहऱ्याची फळांची डिश. या वादातील चित्रांमध्ये अत्यंत बारकाव्यांनिशी रेखाटन व वास्तववादी पद्धतीने रंगकाम केलेले आहे. या वादात साल्व्हेदोर– द– दाली व मॅक्स बरोबर शागल, चेरीको, पॉक क्ले या कलावंतांनी चित्रनिर्मिती केली. तसेच चित्रकलेबरोबर काव्य, साहित्य तत्वज्ञान या कलांमधून हा वाद विकसित झालेला दिसतो. दालीचे 'स्मृती सातत्य' हे चित्र या वादातील प्रसिद्ध चित्र मानले जाते.



चित्र : स्मृती सातत्य (पर्सिटन्स ऑफ मेमरी),
(साल्व्हेदोर – द – दाली)

## २. पाश्चात्य चित्रकार

**रेम्ब्रॉट : (जन्म १६०६ – मृत्यू १६६९)**



रेम्ब्रॉट

१७ व्या शतकातील हा डच चित्रकार व आम्ल रेखनकार जागतिक कलेतील महत्वाचा श्रेष्ठ कलाकार होता. जगातील निरनिराळ्या कला संग्रहालयांत त्याची ५०० ते ६०० चित्रे आजही पाहावयास मिळतात. बारोक कला पूर्णत्वाला नेण्याचे कार्य त्याने केले. त्याच्या कलाशैलीवर अन्य कलावंतांचा प्रभाव दिसत नाही. तत्कालीन प्रथा सोडून त्याने आपल्या आवडीप्रमाणे धार्मिक व पौराणिक विषय, निसर्गदृश्ये, एका व्यक्तीची व सामूहिक व्यक्तिचित्रे, प्राणी अशी अनेक प्रकारची चित्रे रंगवली. त्याच्या शैलीत वास्तवता आणि आध्यात्मिकता याचे अपूर्व मिश्रण झालेले आढळते. मानव व मानवी भावना यांविषयीची त्यांची आस्था 'शरीर शास्त्रांचा पाठ', 'कापड व्यापारांचा संघ', 'रुग्णाची शुश्रुषा करणारा ख्रिस्त' व अन्य आम्लारेखित मुद्राचित्रांतून दिसून येते. त्याचे खरे वैशिष्ट्य त्याच्या चित्रातील प्रकाशयोजनेत आहे.

अंधाऱ्या अवकाशात अचानक पडणाऱ्या प्रखर प्रकाशाच्या झोताने त्याच्या चित्रात नाट्यपूर्ण



चित्र : नाईट वॉच (रेम्ब्रॉट)

परिणामकारकता दिसते. काही ठिकाणी हा प्रकाशाचा खेळ नैसर्गिक व सुसंबद्ध आहे. 'सामूहिक व्यक्तिचित्रे' व 'शरीरशास्त्र पाठ' हे शल्य विशारदांचे व्यक्तिचित्रही प्रसिद्ध आहेत. 'नाईट वॉच' हेही असेच एक सांघिक व्यक्तिचित्र होय. या चित्रामुळे प्रतिष्ठित लोकांची नाराजी ओढवून घेतली व त्याला विपन्नावस्था प्राप्त झाली. त्याने साठपेक्षा अधिक आत्म-व्यक्तिचित्रे रंगवली. तरुणपणापासून वृद्धत्वापर्यंतची ही चित्रे म्हणजे त्याचे जणू आत्मचरित्र होय. त्याच्या सर्व चित्रात प्रकाशझोताखेरीज इतर भाग गडद छायेचा असतो. परंतु छायेतील परावर्तित प्रकाश व रंग सूचित करण्याचे त्यांचे कौशल्य केवळ अप्रतिम आहे. वातावरणाच्या निर्मितीमध्येही त्याचा हातखंडा होता.

### पीटर पॉल रुबेन्स : (जन्म १५७७ – मृत्यू १६४८)

पीटर पॉल रुबेन्स हा १७ व्या शतकातील म्हणजे बारोक कालखंडातील महान कलावंत होय. तो चित्रकार, वास्तुकार, सजावटकार व राजकारणी होता. त्याने इंग्लंड, फ्रॉन्स व स्पेनमध्ये राजदूत म्हणून काम केले. १६०८ मध्ये त्याची फ्लँडर्सचा दरबारी चित्रकार म्हणून



पीटर पॉल रुबेन्स

नेमणूक झाली. त्याने सर्व प्रकारच्या विषयांवर चित्रे काढली. धार्मिक व पौराणिक प्रसंग, लोकजीवन, व्यक्तिचित्रे, निसर्गदृश्ये अशा सर्व प्रकारचे विषय त्याने यशस्वीपणे हाताळले. मायकेल अँजेलो, राफाएल, तिशियन, तिलोरेत्तो अशा पूर्वसूरींच्या कलाशैलींमधील निवडक वैशिष्ट्ये आत्मसात करून त्याने आपली प्रारंभिक शैली बनवली होती. चर्चच्या सुशोभनासाठी आणि प्रासादातील भिंतींच्या व दालनांच्या अलंकरणासाठी उपयुक्त अशी स्वतःची खास शैली त्याने विकसित केली. अत्यंत गतिमान संयोजन, मानवाकृतींच्या रेखाटनातील जोरदार आवेश व जोश, छायाप्रकाशातील तीव्र विरोध, भारदस्त चित्रण आणि चैतन्य ही त्याच्या शैलीची वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या स्टुडिओमध्ये अनेक शिष्य व मदतनीस होते. त्याला भरपूर काम मिळत असे. कामाची पहिली आखणी त्याने केल्यावर मदतनीस ते काम त्याच्या देखरेखीखाली पूर्ण करीत आणि शेवटचा टप्पा तो स्वतः पूर्ण करत असे. त्याला मिळालेल्या मोठ्या कामांपैकी लक्झेंबर्ग प्रासादासाठी प्रचंड आकारांची २१ भव्य चित्रे ही

त्यापैकी आहेत. ही चित्रे सध्या पॅरिसच्या लूव्र म्युझियममध्ये आहेत. अँटवर्प कँथेड्रलमधील ख्रिस्ताचे क्रूसारोह व क्रूसावरोहण ही दोन चित्रे त्यातील शारीरिक हालचाल, तिरकी कर्णाची रचना, कृत्रिम पद्धतीने प्रकाशाचा उपयोग व कारुण्यपूर्ण भावाविष्कार याबद्दल प्रसिद्ध आहेत. ल्युसिपसच्या मुलींचे अपहरण, फेल्ट हॅट, ॲमेझॉन, स्त्रियांशी युद्ध ही चित्रे गतिमान व जोशपूर्ण संयोजन आणि छाया प्रकाशाचे समर्थ चित्रण याबद्दल प्रसिद्ध आहेत. युरोपातील निरनिराळ्या म्युझियममध्ये त्यांची ३००० हून अधिक चित्रे पाहावयास मिळतात.

### फेल्ट हॅट :

बारोक काळातील अग्रगण्य फ्लेमिश चित्रकार पीटर पॉल रुबेन्स याचे हे प्रसिद्ध व्यक्तिचित्र होय. त्याची मेहुणी सुसाना फोर्मेट हिच्या चेहऱ्यावर डोक्यावरील फेल्ट हॅटची छाया पडली आहे असे हे दृश्य आहे. छायेत दिसणारा परावर्तित प्रकाशाचा परिणाम दाखवण्यात रुबेन्स कमालीचा यशस्वी झाला आहे. चेहऱ्यावरील अर्धस्फुटित हास्य, चेहऱ्याच्या मांसल भागावरील शीत व चमकदार वर्ण आणि हॅट, पोशाख व पार्श्वभूमी रंगवण्यातील सफाईदार जोश यामुळे हे व्यक्तिचित्र अविस्मरणीय झाले आहे.



चित्र : फेल्ट हॅट (रुबेन्स)

### लिओनार्दो-द-विंची : (१४५२-१५१९)



लिओनार्दो द विंची

उच्च प्रबोधन काळातील हा सर्वश्रेष्ठ कलावंत. वैज्ञानिक, तत्त्वचिंतक, चित्रकार, शिल्पकार, अभियंता, संगीतकार अशा सर्व शास्त्रांत व कलांमध्ये निपुण असलेला हा कलावंत अलौकिक प्रतिभेचा महामानव होता. त्यांचा जन्म फ्लॉरेन्सजवळील विंची खेड्यात झाला. लहानपणी ते गायन व वादन कलेत तरबेज होते. ज्ञानप्राप्तीची तीव्र इच्छा व सतत वेगवेगळ्या क्षेत्रातील आवड व कुतूहल यामुळे ते प्रयोगशील बनले. फ्लॉरेन्समध्ये लिओनार्दोनी १० ते १२ वर्षे शास्त्र आणि कला यांची उपासना केली. त्यांच्या मते काव्य व कला ही वास्तवाच्या ज्ञानाचे साधन आहे. विज्ञानातील सत्य व कलेतील सत्य सारख्याच तोलाचे आहेत आणि त्याचा पाया सूक्ष्म अचूक, निसर्ग निरीक्षणात आहे असे मत होते.

विविध क्षेत्रातील कार्याबरोबरच त्यांनी काही चित्रे रंगवली. लष्करी अभियंता म्हणून काम करताना त्यांनी मानवी देहाचे शवविच्छेदन विपुल प्रमाणात केले व शरीरशास्त्राचा परिपूर्ण अभ्यास केला. चित्रकला क्षेत्रातील कामावर ते समाधानी नव्हते. त्याच्या चित्रात शास्त्रीय व भावनात्मक प्रवृत्तींचा सुरेख संगम आढळतो. मोनालिसा या चित्रातील सूक्ष्म भावदर्शन हे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांच्या चित्रातील संयोजन सूचिच्या


आकाराचे आहे. छायाप्रकाश व सूक्ष्म छायाभेद त्याचा सूचक वापर त्यामुळे निर्माण झालेली वस्तूंची गोलाई व घनता दाखवण्याचे त्यांचे कसब अप्रतिम होते. चित्रातील यथार्थ दर्शन सखोलता, अनेकार्थ सूचकता, प्रवाही वक्राकार रेखांकन, नेटक्या व सुबक व्यक्तिरेखा, सौम्य रंगछटा त्यातून एक आकार दुसऱ्या आकारात सहजपणे मिसळणारी 'फ्युमातो' ही रंगलेपनाची पद्धत ही त्यांच्या चित्राची वैशिष्ट्ये आहेत. विविध विषयांवरील त्यांनी तयार करून ठेवलेल्या सुमारे ५००० पृष्ठांच्या टिपणवह्या पुढच्या पिढ्यांना प्रेरक व मार्गदर्शक असणारा ठेवा होता. ते रेखाटन व लेखन डाव्या हातांनी, तर रंगकाम दोन्ही हातांनी करत असत. मोनालिसा, द लास्ट सपर (येशूचे अंतिम भोजन) ह्या त्यांच्या सर्वात जास्त गाजलेल्या कलाकृती आहेत. 'सेंट ॲन समवेत कुमारी माता व बालक येशू' या विषयावर त्यांनी अनेक रेखाटने केली. याशिवाय त्यांनी फ्लॉरेन्समधील अनेक व्यक्तींची व्यक्तिचित्रे तयार केली. फ्रेंच राजा पहिल्या फ्रॉन्सिसने त्यांना अग्रणी चित्रकार वास्तुकार, यंत्रज्ञ म्हणून मानाचा किताब दिला. त्यांच्या शैलीचा तरुण चित्रकारांवर खूपच प्रभाव पडला. 'प्रस्तरापुढील मदोन्ना' हे लिओनार्दोने रंगवलेल्या काही चित्रांपैकी एक प्रमुख चित्र होय. प्रगत प्रबोधकाळातील शैलीचे तंत्र या चित्रातून दिसते. मागील प्रस्तरांच्या गडद पार्श्वभूमीतून खडकांची घडण व भूरचना याविषयींचे त्यांचे संशोधनात्मक निरीक्षण दिसून येते. अत्यंत बारकाव्यांनिशी त्यांनी ते चित्रित केले आहे. अवकाशातील घनतापूर्वक आकृत्या, चेहऱ्यावरील प्रसन्न भाव, नाजूक अवयव, मुलांच्या शरीरावरील मार्दव व गोंडसपणा ह्याचे चित्रण अप्रतिम आहे. मदोन्नाच्या अधांतरी हातामुळे चित्रात त्रिमिती अभ्यास निर्माण होतो. शंकुच्या आकारासारखी त्रिकोणी रचना, पार्श्वभूमीत मिसळणारा चित्र आकाराचा काही भागांमुळे हे चित्र म्हणजे जगातील उत्कृष्ट चित्रांपैकी एक अशी गणना होते.

### येशूचे अंतिम भोजन

**माध्यम–** टेंपरा पद्धतीने तैलरंग

**कलाकार –** लिओनार्दो-द-विंची

**कालखंड –** इ.स.१४८७ ते १४९८



चित्र : येशूचे अंतिम भोजन (लिओनार्दो द विंची)

लिओनार्दो-द-विंची यांनी हे भव्य भित्तिचित्र मिलान येथील चर्चच्या भोजनगृहात (मठाच्या भिंतीवर) रंगवले आहे. हे चित्र ११ वर्षांच्या मेहनतीनंतर पूर्ण झाले. टेंपरा पद्धतीने रंगवलेल्या या चित्रात तैलरंगाचा वापर केला आहे. या चित्रात येशू ख्रिस्त आपल्या जवळच्या बारा शिष्यांसमवेत भोजन घेत आहे असे दाखवले आहे. यांपैकी एक शिष्य माझा विश्वासघात करणार आहे, असे भाकीत येशू ख्रिस्ताने वर्तवले आहे. त्यामुळे हे अंतिम भोजन आहे. हे ऐकताच त्याचा परिणाम वेगवेगळ्या शिष्यांवर वेगवेगळ्या प्रकारे झाला आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील आश्चर्य, राग, दुःख या संमिश्र भावभावनांचे व मानसिक तणावाचे चित्रण यात दिसते. या चित्रातील रचना, रंगयोजना, छायाप्रकाश व येशूच्या व्यक्तिमत्त्वाला दिलेले महत्त्व, चित्रातील खोली, यथार्थ दर्शन, सपाट पृष्ठभागावरील संकल्परचना ही या चित्राची वैशिष्ट्ये आहेत. मानवी स्वभावांचे दर्शन, व्यक्तींचे हावभाव, छायाप्रकाशाचा नाट्यमय वापर, धार्मिकतेचा आविष्कार यामुळे हे चित्र जगप्रसिद्ध आहे. लिओनार्दोने प्रयोगशील वृत्तीतून हे चित्र रंगवले आहे. त्यामुळे आता या चित्रातील रंग फिके पडले आहेत. परंतु संयोजनाच्या दृष्टीने हे चित्र अप्रतिम आहे.

**मोनालिसा :**

**माध्यम :** तैलचित्र

**कलाकार :** लिओनार्दो-द-विंची

**कालखंड –** १५०१ ते १५०४

**वैशिष्ट्ये :** फ्लॉरेन्समधील फ्रान्सेस्को देल जोकोन्दो या व्यापाऱ्याच्या पत्नीचे हे व्यक्तिचित्र कलेच्या क्षेत्रात अजरामर झाले आहे. व्यक्तिचित्रणातील ही सर्वोच्च सिद्धी मानली जाते. मोनालिसाच्या चेहऱ्यावरचे गूढ,



**चित्र : मोनालिसा (लिओनार्दो द विंची)**

मंद स्मितहास्य हा आजतागायत संशोधनाचा व लेखनाचा विषय बनला आहे. मोनालिसाच्या डोळ्यातील विलक्षण चैतन्यपूर्ण जिवंत भाव, त्यातून डोकावणारे सूक्ष्म कारुण्य, हातांचे व त्यावरील वस्त्रांच्या चुण्यांचे अत्यंत कौशल्यपूर्ण सुबक रेखाटन, चित्राला दिलेली निसर्गाची-काल्पनिक गिरी प्रदेशाची गूढरम्य पार्श्वभूमी, धूसर बाह्यरेषा व सौम्यसर रंगातून स्कुमातो तंत्राचा वापर ही या चित्राची वैशिष्ट्ये आहेत. गडद रंगाचे मोनालिसाचे वस्त्र व मागील निसर्गातील मंद प्रकाशात मोनालिसाच्या चेहऱ्यावरील उजळ कांती याचे चित्रण यथार्थ दर्शनाची सखोलता व मोनालिसाच्या चेहऱ्यावरील गूढ हास्यामुळे हे चित्र जगप्रसिद्ध आहे. हे चित्र सध्या पॅरिसच्या लूव्र म्युझियममध्ये पाहावयास मिळते.

## माझा अभ्यास

**प्र.१ एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. दृकप्रत्ययवादाचा प्रणेता कोण?
२. रंग व प्रकाश या दोन महत्वाच्या गोष्टी कोणत्या वादाच्या चित्रणात दिसतात?
३. दृकप्रत्ययवादात भावविष्काराकडे का दुर्लक्ष झाले?
४. 'इंप्रेशनिझम' हे नाव कसे दिले गेले?
५. आविष्कारवादाचा प्रणेता म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?
६. आविष्कारवादाच्या दोन गटांची नावे कोणती?
७. काळ्या व तपकिरी रंगाकडे जाणाऱ्या रंगांत कोणत्या वादाची चित्रे रंगवलेली आहेत?
८. आविष्कारवादातील ऍडवर्ड मुंक व व्हॅन गॉखच्या प्रसिद्ध कलाकृतींचे नाव काय?
९. पिकासो व ब्राक हे कोणत्या वादाचे आद्यप्रवर्तक म्हणून ओळखले जातात?
१०. कोणत्या चित्रकाराच्या लेखनातून पिकासो व ब्राक यांना प्रेरणा मिळाली ?
११. कोणत्या शैलीत विश्लेषणात्मक व संश्लेषणात्मक हे प्रकार विशेष आढळतात?
१२. विश्लेषणात्मक घनवादातील दोन प्रसिद्ध चित्रांची नावे कोणती?
१३. घनवादातून कोणते नवे तंत्र निर्माण झाले?
१४. साल्व्हेदोर दाली व मॅक्स या चित्रकारांनी कोणता वाद निर्माण केला?
१५. अतिवास्तववादातील साल्व्हेदोर दालीच्या प्रसिद्ध चित्राचे नाव काय?
१६. जागतिक कलेतील महत्वाचा आम्ल रेखनकार म्हणून कोणता कलाकार श्रेष्ठ समजला जातो?
१७. रेम्ब्रॉट याने कोणती कला पूर्णत्वाला नेण्याचे कार्य केले?
१८. पीटर पॉल रुबेन्स हा कोणत्या कालखंडातील महान कलावंत होता?
१९. पीटर पॉल रुबेन्स याने स्वतःची अशी कोणती खास शैली विकसित केली?
२०. 'ग्वेर्णिका' हे प्रसिद्ध चित्र कोणत्या महान कलावंताचे आहे?

**प्र. २ जोड्या लावा.**

| 'अ' गट (कलाकार) | 'ब' गट (प्रसिद्ध कलाकृती) |
|---|---|
| १. पीटर पॉल रुबेन्स | स्थिरचित्रे |
| २. रेम्ब्रॉट | स्मृती सातत्य |
| ३. क्लॉद मोने | तीन संगीतकार |
| ४. एडवर्ड मुंक | स्टारी नाईट |
| ५. व्हिन्सेंट व्हॅन गॉख | द क्राय |
| ६. पिकासो | इंप्रेशन सनराईज |
| ७. साल्व्हेदोर – द – दाली | नाईट वॉच |
| ८. ब्राक | ल्युसिपसच्या मुलीचे अपहरण |

**प्र. ४ टीपा लिहा.**

१. अतिवास्तववाद
२. आविष्कारवाद

**प्र ५. रसग्रहणात्मक टीप लिहा.**

१. रात्रीचा पहारा (नाईट वॉच)
२. फेल्ट हॅट